Marathwada Shikshan Prasarak Mandal's

# Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon




## INTERNAL QUALITY ASSURANCE CELL

## Criterion VII- Institutional Values & Best Practices

### 7.1 Institutional Values and Social Responsibilities

7.1.4 **Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and Sensitization of students and employees to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens.**

## Report of Lifelong Learning Program

Marathwada Shikshan Prasarak Mandal's

# Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

## Lifelong Extension Scheme

## Index

| Sr. No | Particulars | Year |
|---|---|---|
| 1 | Lifelong Extension Scheme – Report & Photo | 2017-2018 |
| 2 | Lifelong Extension Scheme – Report & Photo | 2018-2019 |
| 3 | Lifelong Extension Scheme – Report & Photo | 2019-2020 |

म.शि.प्र.मंडळ संचलित,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगांव

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## महाविद्यालय स्तरावर घेतलेल्या कार्यक्रमाचा अहवाल २०१७-१८

दिनांक २३ जुलै २०१७ रोजी म.शि.प्र.मंडळ संचलित, सुंदरराव सोळंके महाविद्यालयात, आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने २३ जुलै २०१७ रोजी पर्यावरण जनजागृती व वन संवर्धन या विषयावर महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.यु.बी.किट्टेकर हे होते. तर अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आय.बी.साळुंखे हे होते. यावेळी डॉ.किट्टेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तराच्या रूपाने पर्यावरणाचा बिघडत चाललेला असमतोल व वृक्षारोपनाचे महत्व यावर मार्गदर्शन केले तर अध्यक्षिय समारोपात डॉ.आय.साळुंखे यांनी पर्यावरणातील विविध घटकांवर प्रकाश टाकले व विंद्यार्थ्यात पर्यावरणाविषयी जागृती निर्माण केली. या दिवसापासुन महाविद्यालयात दर बुधवारी प्रदुषणमुक्त परिसर व वाहनमुक्त दिवसाची शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्तावित कार्यक्रमाधिकारी बी.आर.बोडके यांनी केले व सुत्रसंचलन डॉ.बी.आर.नळे यांनी केले. व आभार प्रा.एन.आर.ढवळे यांनी मांडले यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.०२ ऑक्टो. २०१७ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म.शि.प्र.मंडळाचे केंद्रिय कार्यकारीणी सदस्य मा.भारतराव सोळंके हे होते. तर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार, उपप्राचार्य डॉ.के.बी.गंगणे यांची होती. यावेळी महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वच्छता विषयक मोहिम हाती घेण्यात आली व महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आले.यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.३१ ऑक्टो. २०१७ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली व एकता दौड रॅलीचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९.०० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार यांनी सरदार पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन केले तर डॉ.के.बी.गुंगणे यांनी पटेलांच्या स्वप्नातील एक संघ भारत या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.२८ नोव्हें. २०१७ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभगाच्या वतीने महात्मा फुले यांचा स्मृती दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.संजय बागुल हे होते, तर अध्यक्ष म.शि.प्र.मंडळाचे केंद्रिय कार्यकारीणी सदस्य मा.भारत आबा

पुढील पानांवर.......

सोळंके हे होते. यावेळी संजय बागुल यांनी महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकून शिक्षण हाच पाया आहे असे सांगितले.यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.१५ फेब्रु.२०१८ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालयात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी. पवार हे होते तर प्रमुख मार्गदर्शक डॉ.भाऊसाहेब राठोड हे होते. यावेळी डॉ.भाऊसाहेब राठोड यांनी बोलताना म्हटले की, संत सेवालाल महाराज हे महाराज नसुन एक थोर क्रांतीकारक होते, असे म्हटले. या कार्यक्रमाचे प्रास्तावित प्रा.बी.आर.बोडके यांनी केले व सुत्रसंचलन अमोल राठोड यांनी केले तर आभार रवि राठोड यांनी मानले यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Programme Officer**
**Lifelong Learning & Extension Activity**
**Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon**

***Principal***
**Sunderrao Solanke Mahavidyalaya**
**Majalgaon Dist.Beed (M.S.)**

### म.शि.प्र.मंडळ संचलित,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगांव

### आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## सामाजिक स्तरावर घेतलेल्या कार्यक्रमाचा अहवाल २०१७-१८

दि.२७ जुलै २०१७ रोजी म.शि.प्र.मंडळ संचलित सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने नागपंचमीच्या दिवशी अंधश्रद्धा निमुलन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.ए.ए.अन्सारी हे होते. तर अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार हे होते. समाजाच्या मनामध्ये नागाविषयी असलेले समज व गैरसमज व अंधश्रद्धा या विषयी प्रबोधन केले. साप हा मानवाचा शत्रु नसुन तो मित्र आहे असे यावेळी ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार यांनी सर्वांना नैसर्गिक रित्या जीवन जगण्याचा अधिकार आहे. म्हणुन आपण सापाला मारू नये अन्यथा नैसर्गिक संतुलनाची साखळी तुटू शकते आणि मानवी जिवन धोक्यात येवू शकते असे म्हटले, यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.११ सप्टें. २०१७ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने हुंडाबंदी जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी म.शि.प्र.मंडळाचे केंद्रिय कार्यकारीणी सदस्य व महाविद्यालयाचे स्थानिक नियामक मंडळाचे सर्व सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, महिला, विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने रॅलीला उपस्थित होते. यावेळी फलकाव्दारे हुंडाबंदी विषयी व हुंडाबंदी कायद्याविषयी जाणिव जागृती करण्यात आली. तसेच हुंडा देणार नाही , देणार नाही व हुंडा घेणार नाही, घेणार नाही अशा घोषणा देण्यात आल्या. सदर रॅली महाविद्यालयातुन आंबेडकर चौक व तेथून परत महाविद्यालयापर्यंत काढण्यात आली. सदर रॅलीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार यांनी संबोधित केले व राष्ट्रगीताने रॅलीची सांगता करण्यात आली.

दि.२२ सप्टें.२०१७ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयातील सुंदररत्न करिअर ॲकॅडमी येथे आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षाचे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी औरंगाबाद येथील रिलॅबल ॲकॅडमीचे डॉ.गणेश राठोड हे प्रमुख मार्गदर्शक होते त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षाविषयी सखोल असे मार्गदर्शन केले व स्पर्धा परीक्षाविषयी विद्यार्थ्यांच्या मनात आवड निर्माण केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार हे होते. यावेळी परिसरातील आजी-माजी विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक ३० नोव्हें. २०१७ रोजी मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरूवात महाविद्यालयाच्या प्रांगणातुन उपप्राचार्य डॉ.आय.बी.साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आली. मतदानाविषयी

पुढील पानांवर.......

घोषवाक्य व फलक तयार करून मतदानाविषयी समाजामध्ये जनजागृती करण्यात आली. यावेळी निवडणुक आधिकारी तहसिलदार व महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.०९ जाने.२०१८ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने महिला विषयक कायदे या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्त्या निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती प्रियंका पवार ह्या होत्या. तर अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आय.बी.साळुंखे हे होते. यावेळी महिला विषयक असलेले कायदे व त्याव्दारे मिळणारे हक्क आणि अधिकारी संबंधी सखोल मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिरी प्रा.बी.आर.बोडके यांनी केले तर आभार प्रा.जि.टी.मोकासरे यांनी मानले तर सुत्रसंचलन अंशीराम शिंदे यांनी केले. यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.२३ फेब्रु.२०१८ रोजी संत गाडगेबाबा जयंती निमित्त राजषी शाहु महाराज मल्टिस्टेट माजलगांव येथे आर्थिक साक्षरता व बचत या विषयावर आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले यावेळी मल्टिस्टेट चे चेअरमन मा.ढगे सर, संचालक,कर्मचारी, कर्जदार व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Programme Officer**
**Lifelong Learning & Extension Activity**
**Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon**

***Principal***
**Sunderrao Solanke Mahavidyalaya**
**Majalgaon Dist.Beed (M.S.)**

**म.शि.प्र.मंडळ संचलित**
**सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगांव**
**आजीवन शिक्षण व विस्तार विभाग**
**दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेश व व्यवसाय मार्गदर्शन शिबीराचा अहवाल २०१७-१८**

---

सुंदरराव सोळंके महाविद्यालय येथे आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन दिनांक २८/०२/२०१८ रोजी करण्यात आले तर समारोह दिनांक १/०३/२०१८ रोजी करण्यात आले. या दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीरात वेगवेगळे कार्यक्रम घेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटक श्री.सिध्देश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विनायक देशमुख हे होते. तर अध्यक्ष महाविद्यालयाचे उप.प्राचार्य डॉ.के.बी.गंगणे हे होते. यावेळी उद्‌घाटक म्हणून मार्गदर्शन करताना डॉ.विंनायक देशमुख म्हणाले की, शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांनी व्यवसायीक शिक्षण व इतर सर्टिफिकेट कोर्सेस केले पाहिजे तरच विद्यार्थी स्वावलंबी बनु शकतात. नौकरी हे शिक्षणाचे उद्दिष्टे न रहाता ते व्यापक असले पाहिजे असे म्हणाले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.गंगणे यांनी आजचा विद्यार्थी भरकटत चाललेला आहे त्यांना योग्य दिशा देण्याची गरज आहे. आणि ती दिशा अशाच कार्यक्रमातून मिळते असे म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.बी.आर.बोडके यांनी केले तर सुत्र संचलन प्रा.राम खंदारे यांनी केले. तर आभार प्रकटिकरण अंशीराम शिंदे यांनी केले यावेळी प्रा.कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

दि.२८/०२/२०१८ रोजी दुसऱ्या सत्रात व्यवसाय मार्गदर्शन या विषयावर डॉ.आय.बी.साळूंखे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना शेती व्यवसाय,शेतीपुरक व्यवसाय, लघू उद्योग यावर सखोल मार्गदर्शन केले. जर शेतीला संपन्न बनवायचे असेल तर शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभे राहिले पाहिजे. तरच शेतीला आणि विद्यार्थ्यांना चांगले दिवस येतील असे म्हणाले या सत्राचे अध्यक्ष डॉ.एन.के.मुळे हे होते. सुत्रसंचलन लखन चव्हाण यांनी केले तर आभार अभिषेक शिल्पे यांनी मानले यावेळी प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि.२८/०२/२०१८ रोजी तिसऱ्या सत्रात व्यक्तीमत्त्व विकास या विषयावर डॉ.बी.आर.नळे यांनी मार्गदर्शन केले. माणसाचा विकास हा सर्वांगीण असला पाहिजे. व्यक्तीमत्त्व विकास हा माणसाचा आरसा असतो. असे यावेळी म्हणाले मुलाखत आणि व्यक्तीमत्त्व विकास यावरही प्रकाश टाकला या सत्राचे अध्यक्ष डॉ.डि.एन.शिंदे हे होते. यावेळी शिक्षक,शिक्षिकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि.०१/०३/२०१८ रोजी कॅशलेश व्यवहार व बँकिंग या विषयावर श्री.सिध्देश्वर महाविद्यालयाचे प्रा.अशोक होके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भ्रष्टाचारमुक्त भारत निर्माण करण्यासाठी

कॅशलेश व्यवहार महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन यावेळी केले. या सत्राचे अध्यक्ष प्रा.जी.टी.मोकासरे हे होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी,शिक्षक,शिक्षिकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि.०१/०३/२०१८ रोजी दुसऱ्या सत्रात मुलाखत तंत्र या विषयावर डॉ.एम.ए.कव्हळे यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. मुलाखतीत उमेदवार हा सुट-सुटीत सहज व साध्या सोप्या पध्दतीने कोणत्याही प्रकारचे दबाव न घेता आलेल्या प्रश्नांचे उत्तरे शांत पध्दतीने द्यावे. मुलाखतीवेळी मन आणि चेहरा प्रसन्न ठेवले तर पुढच्या व्यक्तीचा विश्वास काहिसा आपण जिंकू शकतो. आणि मुलाखतीत यशस्वी होऊ शकतो. या सत्राचे अध्यक्ष डॉ.यु.बी.किट्टेकर हे होते यावेळी शिक्षक,शिक्षिकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि.०१/०३/२०१८ रोजी समारोप सत्र घेण्यात आले. या सत्राचे अध्यक्ष स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य प्रा.निळकंठ साबळे हे होते. प्रमुख मार्गदर्शक डॉ.के.बी.गंगणे हे होते. यावेळी २ दिवसीय कार्यशाळेचे महत्व विषद करून हि कार्यशाळा विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व घडविण्याच्या दृष्टीकोनातून निश्चितच सफल झाली आहे असे म्हणाले. यावेळी उपप्राचार्य, कार्यक्रमाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Programme Officer
Lifelong Learning & Extension Activity
Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

Principal
Sunderrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed (M.S.)

M.S.P. Mandal,

# Sundarrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

Department of Lifelong Learning and Extension Activity.

**Programmes Conducted at the College Level**

The Dept. of Lifelong learning and Extension activity of the college orginzed diffrent programmes in the academic year 2017-18

The dept. of lifelong learning and extension orgnized a talk on Environment consciousness and conservation of forest on 23 rd juley 2017 in the campus of sundarrao solanke mahavidyalaya majalgaon. The keynote speaker was Dr.U.B. Kittekar. The vice Principal of the college Dr.I.B. Salunkhe presided over the programme. In his talk, Dr.Kittekar intracted with the students in questions answers method over the deteriorating balance of the environment amd the importance of Tree plantation. In his presidential address, Dr.Salunkhe focused on various issues related to the environment. All the students and staff members were given a row to keep every wednesday as pollution free day and no vehicle day in the campus. The programme officer Mr.B.R. Bodke put the introductory remains and Dr.B.R. Nale anchored the programme Mr.N.R. Dhavale expressed vote of thanks of the programme. All the staff members and students were present for this programme.

The Dept. of life long education and extension celebrated the birth anniversaries of M.Gandhi and Lal Bahadur Shastri on 2 nd Oct.2017 in the college. The executive council member and LGC member Bharatrao Solanke President over the function in the presence of the Principal Dr.V.P. Pawar. After gavalnding the images of the grate national heroes a cleanliness drive was taken in the college campus. Students and Staff members were present in great number on this occsion.

On 31st Oct. 2017 the dept. orgnized a rally for unity in the city. Pricipal Dr.V.P.Pawar offer garland to the image of late. Sardar Patel. Dr. K.B. Gangane talked over the contribution of Sardar Patel for Building a union of India. All the Staff Members and Studets were Present

P.T.O.

on this occasion.

The Dept. conducted a programme on the occasion of the death anniversary of M.Fule. This Programme was President over by Mr.Bharatrao Solanke and Mr.Sanjay Bagul was the chief Speakers. Mr.Bagul focussed on the work life of M.Fule Specially in the field of education. students and staff member were present in great number for this function.

On 15 th Feb.2018 the college celebrated the birth aniversary of Sevalal Maharaj. Principal Dr.V.P. Pawar Presided over the function and Dr.B.D. Rathod was the chief speakers. Mr.B.R. Bodke put this introductory remarks and Mr.Amol Rathod anchored the programme Miss.Shinde Vaishali expressed vote of thanks in the programme.

**Programme Officer**
**Lifelong Learning & Extension Activity**
**Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon**

***Principal***
**Sunderrao Solanke Mahavidyalaya**
**Majalgaon Dist.Beed (M.S.)**

M.S.P. Mandal,

# Sundarrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

Department of Lifelong Learning and Extension Activity.

**Programmes Conducted at the Society Level**

---

The Dept. Conducted a programme on the occasion of Naag Panchami for the eradication of superstitions in the college. Mr.A.A.Ansari was the chief Speaker and Principal Dr.V.P. Pawar presided over the function. various conceptions and Missconceptions regarding the snakes were discussed and analyzed in scientific manner in the programme. The president focussed on the importance of the biological food chain and the status of snakes in it. Students and staff member attended the programme in good number.

On 11th Sept. 2017 the dept. orgnized a rally on awarness regarding the victims of dowry system. All the members of LGC, College Staff and students participated in it. Pri. Dr.V.P. Pawar addressed the rally in the college. the rally was disolved by the singings of the nation anthem.

The Dept. Conducted a comptetive exam guidance lecture on the occasion of Karmvir Bhaurao Patil on 22nd Sept.2017 in Sundarratna Career Acadamy on this occasion. Dr.Ganesh Rathod of Relible Academy Aurangabad Guided the students. Pri.Dr.V.P.Pawar Presided over the programme. Many students were present for this lecture.

A rally for voters awareness was orgnized on 30th Nov. 2017 Banners and Slogens were prepared by students for the rally. The college Staff,students, election officer and tahsildar were present in the rally.

On 9 th Jan. 2018 a Programme was conducted regarding laws

P.T.O.

for women. The Chief speaker was the Deputy Collector Smt.Priyanka Pawar and vice Pri.Dr.I.B.Salunkhe Presided over the function programme officer B.R.Bodke introduced the role behind conducting the programme and Mr.G.T.Mokasare expressed vote of thanks.

On 23rd Feb.2018 the dept. orgnized a lecture on economy literacy and saving in Rajshree Shahu Maharaj Multistate, Majalgon on the occasion the chairman of RSM Multistate Mr.Dhage sir, Co-op, Teachers credit Society Staff and citizens were present for this programme.

**Programme Officer**
**Lifelong Learning & Extension Activity**
**Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon**

***Principal***
**Sunderrao Solanke Mahavidyalaya**
**Majalgaon Dist.Beed (M.S.)**

M.S.P. Mandal,

# Sundarrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

Department of Lifelong Learning and Extension Activity.

Report of Two Days Workshop on

**Student Couseling and Carrier Guidance**

**Academic Year 2017-18**

---

In collaboration with Dr.BAMU, Aurangabad, The Department in the College Conducted a Two Days students Counseling and Vocational Guidance camp. The Camp was inaugurated on 28th feb. 2018. The valedictory Programme was conducted on 1 Mar. 2018. The inaugrator of the camp was the Pri.Dr.Vinayak Deshmukh, Shri. Siddheswar College,Majalgaon. The Vice Pri.Dr.K.B.Gangane Presided over the programme. Dr.Deshmukh under lined the importance of vocational education in the presente age. Dr.Gangane Focussed on the need of such programmes for guiding the students. Programme officer B.R.Bodke Introduced the programme. Mr.Ram Kandhare anchored the programme and Anshiram Shinde vote of thanks. staff and students were present on this occasion.

On 28th Feb. 2018 Dr.I.B. Salunkhe Guided in the second session. He guided on farming related professions Dr.N.K. Mule presided over the session. Lakhan Chavan anchored the programme. Abhishek Shilpe Experessed the vote of thanks.

On 28th Feb. 2018 in the 3rd session, Dr.B.R.Nale spoke on Personality Devlopment.

On 1st Mar. 2018 Mr.Ashok Hoke expressed his views on cashless Transactions and employment apportunities in banking. He expressed the need of corruptions free india through cashless transac-

P.T.O.

tion. Mr.G.T. Mokasare presided over the session.


In the second session on 1st Mar.2018 Dr.M.A.Kavhale guided on Interview techniques he expressed the need the need to master the techniques Dr.U.B. Kittekar presided over the function.

On 1st Mar. 2018 the valedictory session was conducted. The session was presided over by the LGC member Mr.Nilkanth Sable. Dr.K.B. Gangane was the chief speaker. He underlined the importance of such workshops/camps for the developments of programme officers teaching and non-teaching staff.

Programme Officer
Lifelong Learning & Extension Activity
Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

Principal
Sunderrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed (M.S.)


महाविद्यालय स्तरावरील घेतलेल्या कार्यक्रमाच्या फोटो अहवाल २०१७-१८.




पर्यावरण जनजागृती विषयी मार्गदर्शन करताना उपप्राचार्य डॉ. आर. बी. साळुंखे, डॉ. पु. बी. शिंदेकर





म. गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करताना म. शि. प्र. मंडळाचे कें. का. का. सदस्य मा. आरळकर सोनके




सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करताना प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार




म. फुले यांचा स्मृतीदिन साजरा करताना कें.का. सदस्य मा. भाऊराव सोळंके




संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. आर. बोडके.

**Programme Officer**
**Lifelong Learning & Extension Activity**
**Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon**

***Principal***
**Sunderrao Solanke Mahavidyalaya**
**Majalgaon Dist.Beed (M.S.)**


सामाजिक स्तरावरील कार्यक्रमाचा
फोटो अहवाल २०१७-१८




अंधश्रद्धा निर्मूलनावर मार्गदर्शन करताना प्रा. ए. ए. पन्सारे, समवेत प्राचार्य डॉ. वी. पी. पवार




हुंडाबंदीविषयक जनजागृती रॅली.




महिला विषयक कायदे यावर मार्गदर्शन करताना उपजिल्हाधिकारी प्रियंका पवार.




आर्थिक साक्षरता व बचत बाबत मार्गदर्शन ... कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. आर. ...


**Programme Officer**
Lifelong Learning & Extension Activity
Sundarrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

**Principal**
Sundarrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed (M.S.)

दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर - २०१७-१८




प्रतिमा पूजन करताना मान्यवर





मान्यवरांचे स्वागत करताना




प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. आर. बोडके




उद्घाटक प्राचार्य डॉ. विनायक देशमुख मार्गदर्शन करताना




प्रमुख वक्ते म्हणून [illegible] मार्गदर्शन करताना




[illegible] नेत्र याबर मार्गदर्शन करताना डॉ. एस.[illegible] [illegible].

**Programme Officer**
Lifelong Learning & Extension Activity
Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

**Principal**
Sunderrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed (M.S.)

म.शि.प्र.मंडळ संचलित,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## महाविद्यालय स्तरावर घेतलेल्या कार्यक्रमाचा अहवाल २०१८-१९

दि.१३ ऑग.२०१८ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे उद्‌घाटन करण्यात आले. मराठवाड्यातील दुष्काळ व त्यावरील उपाय योजना या विषयावर कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बी.आर.बोडखे हे होते तर अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार हे होते. यावेळी प्राध्यापक बोडखे यांनी विस्तार केंद्राचे उपक्रम आणि मराठवाड्यातील दुष्काळ यावरील उपाय योजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दुष्काळा संबंधी प्राथमिक, दुय्यम आणि शास्वत अशा उपाय योजना सुचवल्या यामध्ये पर्यावरण, जलसंवंर्धन, वनसंवर्धन यांच्या माध्यामातून आपण दुष्काळावर मात करू शकतो असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.डी.एस.शिंदे यांनी केले. तर सुत्रसंचलन प्राध्यापक जि.टी.मोकासरे यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण प्रा.एन.आर.ढवळे यांनी मानले. यावेळी उपप्राचाय पर्यवेक्षक,शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.२७ सप्टे.२०१८ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने सुंदरराव सोळंके महाविद्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड.भानुदासजी डक यांनी फित कापून उद्‌घाटन केले तर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गजानन रूद्रवार हे प्रमुख उपस्थित होते. या रक्तदान शिबीरात बीड येथून बीड ब्लड बँक यांनी रक्त संचलन करण्याचे काम केले. यावेळी महाविद्यालयातील ४२ विद्यार्थी व विद्यार्थींनींनी रक्तदान केले.

दि.१० डिसें.२०१८ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभगाच्या वतीने महाविद्यालयात शेती व्यवसायावर आधारित शेती पुरक व्यवसायाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. यावेळी [illegible] होते. तर कार्यक्रमाचे [illegible]

डॉ.व्ही.पी.पवार हे होते. मार्गदर्शन करताना प्रतापराव ठोंबरे यांनी फळबागायात व रोपवाटीका याविषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.०७ जाने.२०१९ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालयात अंधश्रद्धा निर्मुलन याविषयावर किर्तनाचे अयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रा.गणेश टकले यांनी प्रबोधन केले. समाजातील अनिष्ठ रूढी परंपरा, अंधश्रद्धा यावर त्यांनी प्रबोधन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.भाऊसाहेब राठोड उपस्थित होते. या कार्यक्रमास बहुसंख्यने विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

दि.११ फेब्रु.२०१९ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने स्पर्धा परिक्षांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन पोलिस उपनिरीक्षक श्री.दाने साहेब हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार हे होते. यावेळी विद्यार्थ्यांनी स्पर्धापरिक्षेसाठी जिद्द,चिकाटी,मेहनत व सातत्य ठेवले तरच यशस्वी होता येते असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी जिवनात काही बंधने घातल्याशिवाय स्वत:चा विकास होत नाही व ध्येयपुर्ती करता येत नाही असे यावेळी अध्यक्ष समारोपात प्राचार्य पवार सर म्हणाले.

Programme Officer
Lifelong Learning & Extension Activity
Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

Principal
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon, Dist - Beed.(M.S.).

म.शि.प्र.मंडळ संचलित,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## सामाजिक स्तरावर घेतलेल्या कार्यक्रमाचा अहवाल २०१८-१९

दि.२० ऑग.२०१८ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने मौजे चिंचगव्हाण या ग्रामपंचायतमध्ये ग्रामीण विकासात युवकांचे योगदान या विषयावर कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक गावच्या सरपंच सौ.पंचफुलाबाई शिंदे ह्या होत्या तर अध्यक्ष ग्रामसेवक पवार साहेब हे होते. यावेळी विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतीचा ग्रामीण विकासातील सहभाग याविषयी सविस्तर मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यांनी केले. युवकांनी समाजासाठी आपला उपयोग कसा करावा हे त्यांनी सांगितले तर अध्यक्षीय समारोपात ग्रमसेवक पवार साहेब यांनी युवक आणि समाज यांची बांधीलकी याविषयावर मार्गदर्शन केले या कार्यक्रमास गावातील जेष्ठ नागरिक, सरपंच, उपसरपंच, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.२४ सप्टें.२०१८रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने महिलांचे आरोग्य व कुपोषण या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक डॉ.वर्मा मॅडम ह्या होत्या. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य हे होते. यावेळी डॉ.वर्मा म्हणाल्या की, स्त्रीयांनी उपवास, व्रतवैकल्य करू नये कारण यामुळे अशक्तपणा येतो. आठवड्यातून एकवेळेस उपवास करावा तो शरिरासाठी आवश्यक आहे. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य पवार सर यांनी स्त्री व पुरूष हे महात्मा फुले यांनी म्हटल्याप्रमाणे एकाच गाडीचे दोन चाके आहेत. म्हणुन गाडी निट चालविण्यासाठी दोन्ही चाके मजबूत असावी लागतात असे म्हटले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थीनी व महिला बहुसंख्यने उपस्थित होत्या.

दि.१७ डिसें.२०१८ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने शेतीपुरक व्यवसाय याविषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन म्हणून कृषी विस्तार अधिकारी श्री.यादव साहेब हे होते. यावेळी शेती पुरक व्यवसाय व [illegible] या विषय[illegible] मार्गदर्शन केले. ते बोलताना म्हणाले की, [illegible] फक्त शेती[illegible]

आधारित न राहता शेतकऱ्यांनी शेतीपुरक व्यवसाय केले पाहिजे. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के.बी.गंगणे यांनी शेतीपुरक व्यवसायाचे महत्व सांगितले. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

दि.२१ जाने. २०१९ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय व आजीवन शिक्षण व विस्तार विभगाच्या वतीने अंधश्रध्दा निर्मुलन या विषयावर किर्तनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक किर्तनकार महादेव महाराज चौधरी हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एन.के.मुळे होते. यावेळी अंधश्रध्दा निर्मुलन या विषयावर बोलताना माधव महाराज चौधरी यांनी म्हटले की, संत तुकारामांनी तिर्थी धोंडा पाणी देव, रोकडा सज्जनी । असे म्हटले. देव माणसात आहे, दगडात नाही असेही स्पष्टीकरण केले.यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ.शिंदे डि.एस.यांनी आभार मानले या कार्यक्रमास शिक्षण, ग्रामस्थ, महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

**Programme Officer**
Lifelong Learning & Extension Activity
Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

**Principal**
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon, Dist - Beed.(M.S.).

म.शि.प्र.मंडळ संचलित,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीराचा अहवाल २०१८-१९

सुंदरराव सोळंके महाविद्यालय येथे आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त बिद्यमाने दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीराचे आयोजन दि.१८/०२/२०१९ व १९/०२/२०१९ रोजी करण्यात आले. दि.१८/०२/२०१९ रोजी शिबीराचे उद्घाटन आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे संचालक डॉ.संजय मुन यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार हे होते. मार्गदर्शन करताना डॉ.मुन म्हणाले की,शिक्षण हे व्यवसायावर आधारित असावे, शिक्षणातून रोजगार निर्मिती झाली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये रोजगार क्षमता निर्माण करणे हा शिक्षणाचा मुळ उद्देश असला पाहीजे. याकार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.शिंदे डि.एस.यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप डॉ.पवार सर यांनी केला. प्रा.जी.टी.मोकासरे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

दि.१८/०२/२०१९ रोजी दुसऱ्या सत्रात व्यक्तीमत्व विकास याविषयावर मार्गदर्शन करताना डॉ.एस.एच.पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व हिच त्यांच्या जिवनाची खरी शिदोरी आहे. शिक्षणातून व्यक्तीमत्वाचा विकास होत असतो. शिक्षण आणि व्यक्तीमत्व विकास हि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.के.बी.गंगणे हे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चेतन निसर्गंध या विद्यार्थ्यानी केले तर आभार लखन चव्हाण या विद्यार्थ्याने व्यक्त केले.

१८/०२/२०१९ रोजी तिसऱ्या सत्रामध्ये स्पर्धा परिक्षा याविषयी सुंदररत्न करिअर ॲकॅडमीचे संचालक प्रा.गणेश मोकासरे यांनी मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना प्रा.मोकासरे यांनी स्पर्धा परिक्षेत यशस्वी होण्यासाठी लागणारे वेळेचे नियोजन कसे करावे. यावर प्रकाश टाकला स्पर्धा परिक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांची जिद्द,चिकाटी,सातत्य महत्वाची असते असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष

परिक्षेत यशस्वी होण्यासाठी लागणारे वेळेचे नियोजन कसे करावे. यावर प्रकाश टाकला स्पर्धा परिक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांची जिद्द,चिकाटी,सातत्य महत्वाची असते असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एन.के.मुळे हे होते. सुत्रसंचलन डॉ.शिंदे डि.एस. यांनी केले तर आभार प्रथमेश चाळक या विद्यार्थ्याने मानले.


दि.१९/०२/२०१९ रोजी शिबीराच्या दुसऱ्यादिवशीच्या पहिल्या सत्रात भाषा लेखन आणि कौशल्य याविषयावर बोलताना डॉ.एम.इ.कव्हळे यांनी भाषा हि व्यक्तीची खरी ओळख असे म्हटले. भाषेवर प्रभुत्व असणे यावरून व्यक्तीचे व्यक्तीमत्व लक्षात येते. बोलताना व्यक्तीचे संभाषण कसे आहे, यावरून व्यक्तीचे व्यक्तीमत्व ठरते. संभाषण हे व्यक्तीच्या ज्ञानातून विकसित होत असते. यासत्राचे अध्यक्ष डॉ.बी.डी.राठोड हे होते.यावेळीअध्यक्षीय समारोप करताना ते म्हणाले की, भाषा हाच व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा मौल्यवान दागिना आहे. या कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

दि.१९/०२/२०१९ रोजी दुसऱ्या सत्रात उद्योजकता विकास याविषयावर बोलताना प्रा.ए.के.होके यांनी उद्योगातील नविन संधी आणि उद्योगाचा विकास याविषयी सखोल मार्गदर्शन केले. प्रा.होके बोलताना म्हणाले की, उद्योगही कोणा व्यक्तीची मक्तेदारी नसून प्रत्येक व्यक्तीची कल्पकता आणि चिकाटी यावर अवलंबून असते. याकार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.एस.एस.रूद्रवार हे होते. कार्यक्रमाचे संचलन प्रा.एन.आर.ढवळे यांनी केले तर आभार अमर बादाडे यांनी मानले.

दि.१९/०२/२०१९ रोजी समारोपाच्या सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगरचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.बी.एस.परकाळ हे होते. डॉ.परकाळ यांनी विद्यार्थ्याच्या जीवनातील शिक्षणाच्या पदवी वर्षाचे महत्व सांगितले विद्यार्थ्यांनी पदवी स्तरावर शिक्षण घेताना चौकस रहावे असेही ते म्हणाले. जगातील घडामोडीवर विद्यार्थ्यांची नजर हि कावळ्यासारखी असावी. असेही ते म्हणाले यासमारोपसत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के.बी.गंगणे हे होते. समारोप सत्राचे संचलन कार्यक्रमाधिकारी यांनी केले.तर आभार प्राध्यापक प्रा.ए.एस.पेंटावार यांनी केले.

Programme Officer
Lifelong Learning & Extension Activity
Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon

Principal
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon, Dist- Beed.(M.S.).



M.S.P. Mandal's
Sunderrao Solanke
Mahavidyalaya



KEEP SILENCE
माजलगाव
आयोजित












सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव
आजीवन शिक्षण व विस्तार विभाग
विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर




**Programme Officer**
**Lifelong Learning & Extension Activity**
**Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon**

**Principal**
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon, Dist - Beed.(M.S.).

म.शि.प्र.मंडळ संचलित,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## महाविद्यालय स्तरावर घेतलेल्या कार्यक्रमाचा अहवाल २०१९-२०

दि.१९ ऑग.२०१९ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे उद्‌घाटन करण्यात आले. मराठवाड्यातील दुष्काळ व त्यावरील उपाय योजना या विषयावर कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बी.आर.बोडखे हे होते तर अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार हे होते. यावेळी प्राध्यापक बोडखे यांनी विस्तार केंद्राचे उपक्रम आणि मराठवाड्यातील दुष्काळ यावरील उपाय योजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दुष्काळा संबंधी प्राथमिक, दुय्यम आणि शास्वत अशा उपाय योजना सुचवल्या यामध्ये पर्यावरण, जलसंवर्धन, वनसंवर्धन यांच्या माध्यामातून आपण दुष्काळावर मात करू शकतो असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.डी.एस.शिंदे यांनी केले. तर सुत्रसंचलन प्राध्यापक जि.टी.मोकासरे यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण प्रा.एन.आर.ढवळे यांनी मानले. यावेळी उपप्राचाय पर्यवेक्षक,शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.२१ सप्टे.२०१९ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने सुंदरराव सोळंके महाविद्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड.भानुदासजी डक यांनी फित कापून उद्‌घाटन केले तर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गजानन रूद्रवार हे प्रमुख उपस्थित होते. या रक्तदान शिबीरात बीड येथून बीड ब्लड बँक यांनी रक्त संचलन करण्याचे काम केले. यावेळी महाविद्यालयातील ४२ विद्यार्थी व विद्यार्थीनींनी रक्तदान केले.

दि.१४ डिसें.२०१९ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभगाच्या वतीने महाविद्यालयात शेती व्यवसायावर आधारित शेती पुरक व्यवसायाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन शेतीतज्ञ मा.प्रतापराव ठोंबरे हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य

डॉ.व्ही.पी.पवार हे होते. मार्गदर्शन करताना प्रतापराव ठोंबरे यांनी फळबागायात व रोपवाटीका याविषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.०७ जाने.२०१९ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालयात अंधश्रद्धा निर्मुलन याविषयावर किर्तनाचे अयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रा.गणेश टकले यांनी प्रबोधन केले. समाजातील अनिष्ठ रूढी परंपरा, अंधश्रद्धा यावर त्यांनी प्रबोधन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.भाऊसाहेब राठोड उपस्थित होते. या कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी व विद्यार्थींनी उपस्थित होते.

दि.११ फेब्रु.२०१९ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने स्पर्धा परिक्षांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन पोलिस उपनिरीक्षक श्री.दाने साहेब हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार हे होते. यावेळी विद्यार्थ्यांनी स्पर्धापरिक्षेसाठी जिद्द,चिकाटी,मेहनत व सातत्य ठेवले तरच यशस्वी होता येते असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी जिवनात काही बंधने घातल्याशिवाय स्वत:चा विकास होत नाही व ध्येयपुर्ती करता येत नाही असे यावेळी अध्यक्ष समारोपात प्राचार्य पवार सर म्हणाले.

म.शि.प्र.मंडळ संचलित,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## सामाजिक स्तरावर घेतलेल्या कार्यक्रमाचा अहवाल २०१९-२०

दि.१६ ऑग.२०१९ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने मौजे चिंचगव्हाण या ग्रामपंचायतमध्ये ग्रामीण विकासात युवकांचे योगदान या विषयावर कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक गावच्या सरपंच सौ.पंचफुलाबाई शिंदे ह्या होत्या तर अध्यक्ष ग्रामसेवक पवार साहेब हे होते. यावेळी विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतीचा ग्रामीण विकासातील सहभाग याविषयी सविस्तर मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यांनी केले. युवकांनी समाजासाठी आपला उपयोग कसा करावा हे त्यांनी सांगितले तर अध्यक्षीय समारोपात ग्रामसेवक पवार साहेब यांनी युवक आणि समाज यांची बांधीलकी याविषयावर मार्गदर्शन केले या कार्यक्रमास गावातील जेष्ठ नागरिक, सरपंच, उपसरपंच, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.२३ सप्टें.२०१९ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने महिलांचे आरोग्य व कुपोषण या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक डॉ.अंजली वर्मा ह्या होत्या. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य हे होते. यावेळी डॉ.अंजली वर्मा म्हणाल्या की, स्त्रीयांनी उपवास, व्रतवैकल्य करू नये कारण यामुळे अशक्तपणा येतो. आठवड्यातून एकवेळेस उपवास करावा तो शरिरासाठी आवश्यक आहे. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य पवार सर यांनी स्त्री व पुरूष हे महात्मा फुले यांनी म्हटल्याप्रमाणे एकाच गाडीचे दोन चाके आहेत. म्हणुन गाडी निट चालविण्यासाठी दोन्ही चाके मजबूत असावी लागतात असे म्हटले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थीनी व महिला बहुसंख्यने उपस्थित होत्या.

दि.१६ डिसें.२०१९ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने शेतीपुरक व्यवसाय याविषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन म्हणून कृषी विस्तार अधिकारी श्री.रमेश यादव साहेब हे होते. यावेळी शेती पुरक व्यवसाय व जोडधंदा या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ते बोलताना म्हणाले की, शेतकरी फक्त शेतीवर

आधारित न राहता शेतकऱ्यांनी शेतीपुरक व्यवसाय केले पाहिजे. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के.बी.गंगणे यांनी शेतीपुरक व्यवसायाचे महत्व सांगितले. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

दि.२१ जाने. २०२० रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय व आजीवन शिक्षण व विस्तार विभगाच्या वतीने अंधश्रध्दा निर्मुलन या विषयावर किर्तनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक किर्तनकार परमेश्वर महाराज कुरे हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एन.के.मुळे होते. यावेळी अंधश्रध्दा निर्मुलन या विषयावर बोलताना माधव महाराज चौधरी यांनी म्हटले की, संत तुकारामांनी तिर्थी धोंडा पाणी देव, रोकडा सज्जनी । असे म्हटले. देव माणसात आहे, दगडात नाही असेही स्पष्टीकरण केले.यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ.शिंदे डि.एस.यांनी आभार मानले या कार्यक्रमास शिक्षण, ग्रामस्थ, महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

म.शि.प्र.मंडळ संचलित,

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा अहवाल २०१९-२०

सुंदरराव सोळंके महाविद्यालय येथे आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीराचे आयोजन दि.३०/०१/२०२० व ०१/०२/२०२० रोजी करण्यात आले. दि.०३/०१/२०२० रोजी शिबीराचे उद्‌घाटन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.रामप्रसाद देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आय.बी.साळुंके हे होते. मार्गदर्शन करताना डॉ.देशमुख म्हणाले की,शिक्षण हे व्यवसायावर आधारित असावे, शिक्षणातून रोजगार निर्मिती झाली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये रोजगार क्षमता निर्माण करणे हा शिक्षणाचा मुळ उद्देश असला पाहीजे. याकार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.शिंदे डि.एस.यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप डॉ.पवार सर यांनी केला. प्रा.जी.टी.मोकासरे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थींनी उपस्थित होते.

दि.३०/०१/२०२० रोजी दुसऱ्या सत्रात व्यक्तीमत्व विकास याविषयावर मार्गदर्शन करताना प्रा.रामप्रसाद देशमुख म्हणाले की, विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व हिच त्यांच्या जिवनाची खरी शिदोरी आहे. शिक्षणातून व्यक्तीमत्वाचा विकास होत असतो. शिक्षण आणि व्यक्तीमत्व विकास हि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.के.बी.गंगणे हे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चेतन निसर्गंध या विद्यार्थ्यांनी केले तर आभार लखन चव्हाण या विद्यार्थ्याने व्यक्त केले.

३०/०१/२०२० रोजी तिसऱ्या सत्रामध्ये स्पर्धा परिक्षा याविषयी पी.आय.अनुसया माने, ग्रामीण पोलिस स्टेशन, माजलगाव यांनी मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना पी.आय.माने यांनी स्पर्धा परिक्षेत यशस्वी होण्यासाठी लागणारे वेळेचे नियोजन कसे करावे. यावर प्रकाश टाकला स्पर्धा परिक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांची जिद्द,चिकाटी,सातत्य महत्वाची असते असे त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एन.के.मुळे हे होते. सुत्रसंचलन डॉ.शिंदे डि.एस. यांनी केले तर आभार उमेश चाळक या

विद्यार्थ्याने मानले.

दि.०१/०२/२०२० रोजी शिबीराच्या दुसऱ्यादिवशीच्या पहिल्या सत्रात भाषा लेखन आणि कौशल्य याविषयावर बोलताना डॉ.एम.ए.कव्हळे यांनी भाषा हि व्यक्तीची खरी ओळख असे म्हटले. भाषेवर प्रभुत्व असणे यावरून व्यक्तीचे व्यक्तीमत्व लक्षात येते. बोलताना व्यक्तीचे संभाषण कसे आहे, यावरून व्यक्तीचे व्यक्तीमत्व ठरते. संभाषण हे व्यक्तीच्या ज्ञानातून विकसित होत असते. यासत्राचे अध्यक्ष डॉ.बी.डी.राठोड हे होते.यावेळीअध्यक्षीय समारोप करताना ते म्हणाले की, भाषा हाच व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा मौल्यवान दागिना आहे. या कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

दि.०१/०२/२०२० रोजी दुसऱ्या सत्रात उद्योजकता विकास याविषयावर बोलताना प्रा.एन.आर.ढवळे यांनी उद्योगातील नविन संधी आणि उद्योगाचा विकास याविषयी सखोल मार्गदर्शन केले. प्रा.होके बोलताना म्हणाले की, उद्योगही कोणा व्यक्तीची मक्तेदारी नसून प्रत्येक व्यक्तीची कल्पकता आणि चिकाटी यावर अवलंबून असते. याकार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.एस.एस.रूद्रवार हे होते. कार्यक्रमाचे संचलन प्रा.यु.के.राठोड यांनी केले तर आभार आदिनाथ गिलबीले यांनी मानले.

दि.०१/०२/२०२० रोजी समारोपाच्या सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगरचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.बी.एस.परकाळ हे होते. डॉ.परकाळ यांनी विद्यार्थ्याच्या जीवनातील शिक्षणाच्या पदवी वर्षाचे महत्व सांगितले विद्यार्थ्यांनी पदवी स्तरावर शिक्षण घेताना चौकस रहावे असेही ते म्हणाले. जगातील घडामोडीवर विद्यार्थ्यांची नजर हि कावळ्यासारखी असावी. असेही ते म्हणाले या समारोपसत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के.बी.गंगणे हे होते. समारोप सत्राचे संचलन कार्यक्रमाधिकारी यांनी केले.तर आभार प्राध्यापक प्रा.ए.एस.पेंटावार यांनी केले.



**Coordinator**
Internal Quality Assurance Cell (IQAC)
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon, Dist.Beed (MS)

Sunderrao Solanke Mahavidyalaya
MAJALGAON
DIST.BEED
(MAHARASHTRA)
Majalgaon

PRINCIPAL
Sunderrao Solanke Mahavidyalya
Majalgaon Dist. Beed (M.S.)